महत्वाचे

जा.क्र.उमाशि-२/११ वी प्रवेश/पुवि/२०१४ / १३६८
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : १७/१/२०१४
17 JAN 2014

प्रति

सर्व मुख्याध्यापक
माध्यमिक शाळा
पुणे व पिंपरी चिंचवड शहर परिसर, पुणे

विषय : इ. ११ वी चे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत.

संदर्भ : या कार्यालयाचे परिपत्रक उमाशि-२/११वी प्रवेश/पुवि/२०१४/१३५८
दिनांक १७/१/२०१४

पुणे व पिंपरी महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता ११ वी चे शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील प्रवेश ऑन लाईन पध्दतीने करण्यात येणार आहेत. या संदर्भात मुख्याध्यापकांनी खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१. शाळेतील इयत्ता १० वी तील सर्व विद्यार्थ्यांची त्यांच्या पालकांच्या समवेत दिनांक ३० जानेवारी २०१४ पर्यंत सभा घेवून ऑनलाईन प्रवेशाबाबत माहिती देण्यात यावी. उपस्थित पालकांच्या व विद्यार्थ्यांच्या स्वाक्ष-या घेण्यात याव्यात.
२. विद्यार्थ्यांना अनुदानीत शाळा कॉलेज, विना अनुदानीत शाळा कॉलेज यातील फरक (फी संदर्भातील) त्याचबरोबर स्वतंत्र मुलांचे कॉलेज, स्वतंत्र मुलींचे कॉलेज, मुला-मुलींचे कॉलेज या संकल्पना सहविचार सभेत स्पष्ट करुन सांगव्यात.
३. सदरहू सभेमध्ये ज्या विद्यार्थ्यांना जातीच्या आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा आहे, अशा विद्यार्थ्यांना त्यांचे जातीचे प्रमाणपत्र वेळेत काढण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. तसेच जातीनुसार प्रवर्गाची माहिती (उदा. एससी, एसटी . . इत्यादी) देण्यात यावी.
४. जे खेळाडू विद्यार्थी आहेत (जिल्हा/राज्य/राष्ट्रीय) त्या खेळाडू विद्यार्थ्यांना जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडून विहित प्रमाणपत्र परिक्षेआधीच उपलब्ध करुन घेण्याबाबत अवगत करावे.
५. ज्या विद्यार्थ्यांनी कलेमध्ये प्राविण्य मिळविलेले आहे त्यांनी कला व सांस्कृतिक संचालनालयाचे प्रमाणपत्र उपलब्ध करुन घेण्याबाबत विद्यार्थ्यांना अवगत करावे
६. विशेष आरक्षणानुसार संबंधित विद्यार्थ्यांना (स्वातंत्र्य सैनिक, आजी माजी सैनिक, अपंग इत्यादी) प्रकारातील संबंधित सक्षम अधिका-यांकडून प्रमाणपत्र उपलब्ध करुन घेणेस आवगत करावे.

| अ.क्र. | विशेष आरक्षण | प्रमाणपत्र देणा-या अधिका-याचे नांव |
|---|---|---|
| १ | खेळाडू | जिल्हा क्रीडा अधिकारी |
| २ | कला व सांस्कृतीक | कला व सांस्कृतिक संचालनालय, मुंबई |
| ३ | अपंग | जिल्हा शल्य चिकित्सक |
| ४ | स्वातंत्र्य सैनिक | जिल्हाधिकारी |
| ५ | माजी सैनिक | जिल्हा सैनिक अधिकारी |
| ६ | आजी सैनिक | संबंधित विभागाचे प्रमूख |

७. कॉलेज प्राधान्यक्रम ठरविताना विद्यार्थ्यांना मिळालेले गुण व गेल्यावर्षीचे कॉलेजनिहाय कट आफ पॉईंट याचा अभ्यास करुन प्राधान्यक्रम ठरविण्यात यावा.

१७/१/१४.
(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.